# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com


### ७४) जिल्हा : नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १२ डिसेंबर, २०२५

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१३/१२/२०२५ ते १७/१२/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| पाऊस(मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान(अं.से.) | ३१ | ३१ | ३२ | ३२ | ३२ |
| किमानतापमान (अं.से.) | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| स. सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ६८ | ७० | ७१ | ७१ |
| दु.सापेक्ष आर्द्रता (%) | ३२ | ३२ | ३२ | ३३ | ३४ |
| हवेचा वेग (किमी/तास) | ७ | ८ | ९ | ९ | ९ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| | | |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार जिल्ह्यात पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३१ ते ३२ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १२ ते १६ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज | | दि. १७ ते २३ डिसेंबर २०२५ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरीपेक्षा कमी व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे. |
| **पीक** | **अवस्था** | **कृषी विषयक सल्ला** |
| सामान्य सल्ला | | हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी **मेघदुत** मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | तण व्यवस्थापन आणि जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी आंतरमशागतीची कामे करून घ्यावीत. |
| कापूस | वेचणी | कापसाची वेचणी करून घ्यावी आणि सुरक्षित ठिकाणी ठेवावे. पुढील हंगामात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कापसाचे फरदड (खोडवा) पिक घेऊ नये. |
| गहु | पेरणी ते रोप वाढीची | पिकाच्या चांगल्या वाढीसाठी शेत सुरुवातीपासूनच तण विरहीत ठेवावे. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आंतरमशागत करावी. |
| हरभरा | रोप वाढीची | हरभरा पिकाच्या चांगल्या वाढीसाठी शेत सुरुवातीपासूनच तण विरहीत ठेवावे. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी पीक २० दिवसांचे झाल्यानंतर पहिली कोळपणी करावी. |
| रबी ज्वारी | रोप वाढीची | रबी ज्वारीमध्ये पहिली कोळपणी पेरणीनंतर तीन आठवड्यांनी फटीच्या कोळप्याने करावी. त्यामुळे तणांचे नियंत्रण व पिकाला मातीची भर दिली जाते. |
| तुर | शेंगा वाढीची ते पक्वता अवस्था | पक्वता अवस्थेत असलेल्या तुर पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. शेंग माशी, घाटे अळी आणि पिसारी पतंग या किडींच्या नियंत्रणासाठी, इमामेक्टिन बेन्झोएट (५ एसजी) ०.३ मिलि प्रति लिटर पाणी किंवा इंडोक्झाकार्ब (१४.५ एससी) ०.३ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| पपई | फळ वाढीची | हिवाळ्यात साधारणपणे दर १० दिवसानी गरजेनुसार पाणी द्यावे. पाणी देताना दुरेही आळे पद्धती, सरी किंवा ठिंबक सिंचन यांचा वापर करावा. |
| केळी | फळ वाढीची | हिवाळ्यात बागेत रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. थंडीपासून संरक्षणासाठी केळीच्या घडास ६ % सच्छिद्रतेचे पांढ-या प्लास्टिक बॅगचे आवरण करावे. |

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४

ईमेल: kvk_ndb@yahoo.com

| | | |
|---|---|---|
| पशुसंवर्धन | - | थंडीमुळे जनावरांना न्युमोनिया हा आजार होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या शरीराचे तापमान वाढते व त्यांचे खाणे-पिणे कमी होते. यासाठी थंडीपासून जनावरांचे संरक्षण करावे. थंड वाऱ्यापासून संरक्षणासाठी शेडला पडदे लावावे. |

**स्त्रोत**

**१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.**

**ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**
**दि. : १२/१२/२०२५**

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक,**
**ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**